जा.क्र. पोआअ/विशा/करोनासुरक्षा/ १२८ /२०२० अमरावती शहर, दिनांक २३/०३/२०२०

# प्रेस – नोट

कोरोना विषाणुचा प्रसार देशात व राज्यात वाढता प्रादुर्भाव पाहता त्यास प्रतिबंध व्हावा यादृष्टीने मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांनी दिलेल्या आदेशान्वये पारीत करण्यात आलेल्या कलम १४४ जा.फौ.चे अनुषंगाने अमरावती पोलीस आयुक्तालय हद्दीत जनतेला रस्त्यावर संचार न करण्याचे आवाहन केले आहे. त्यादृष्टीने खबरदारी म्हणुन पोलीस आयुक्तालय हद्दीतील महत्वाचे मार्ग, प्रमुख चौक तसेच गर्दीचे ठिकाणांवर (अत्यावश्यक सेवेची ठिकाणे वगळून) ईतर ठिकाणी नागरीकांचा संचार होउ नये. याकरीता शासनाच्या निर्देशाप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.

पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील पो. ठाणे हद्दीतील महत्वाचे चौक, गर्दीचे ठिकाण अश्या ४५ ठिकाणी नाकाबंदी पॉईट लावण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे, पो.स्टे.चे दुय्यम मोबाईलद्वारे पेट्रोलींग करण्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे. सर्व नागरीकांनी आप–आपले घरात राहणेकरीता मेगा–फोन/ लाउडस्पीकरद्वारे जनतेला आवाहन करण्यात येणार आहे. तसेच, होलसेल व घावुक किराणा माल विक्रेते यांची बैठक घेवून त्यांनी त्यांची आस्थापना बंद ठेवून किरकोळ विक्रेत्यांना त्यांचे मागणीनुसार जिवनावश्यक साहित्य वाहनातुन त्या त्या ठिकाणी पुरवितील अशी व्यवस्था करणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहे.

तसेच, गरजू व्यक्ती / जेष्ठ नागरिक यांना वैद्यकीय सेवेची आवश्यकता असल्यास उपलब्ध करुन देण्याकरीता प्रत्येक पो. ठाणे येथे दोन पोलीस कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. संबंधितांना गरज भासल्यास त्यांनी संबंधित पो. ठाणे येथे कळविल्यास त्यांना आवश्यक सहकार्य करण्यात येणार आहे. जेणेकरुन त्यांना मदत होवून ते रस्त्यावर येणार नाहीत.

अनावश्यक वाहनांची वाहतूक होणार नाही याकरीता **अमरावती पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील कोणत्याही रस्त्यांवर, सार्वजनिक वाहतूकीने रस्त्यांवर, गल्लोगल्ली याठिकाणी सायकल तसेच पारंपारीक व अपारंपारीक इंधनावर चालणा–या मोटार सायकल गिअरसह/शिवाय, सर्व प्रकारच्या तीनचाकी वाहने, हलकी वाहने, मध्यम वजनाची वाहने, जड वाहतूकीची वाहने यांचा प्रवास व वाहतूक यासाठी वापर करण्याची मनाई करणारा कलम १४४ – २ जा.फौ. प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे.**

**पो.ठाणे फोन नंबर –**

| अ. | पो.ठाणे | फोन नंबर |
|---|---|---|
| १ | कोतवाली | २६७२००१ |
| २ | राजापेठ | २६७२०१० |
| ३ | खोलापुरी गेट | २६७८१३३ |
| ४ | भातकुली | २३८९१०९ |
| ५ | गाडगेनगर | २६७९३३० |
| ६ | नागपुरी गेट | २६७५५६९ |
| ७ | वलगांव | २३८६२३३ |
| ८ | फ्रेजरपूरा | २५५२६०० |
| ९ | नांदगाव पेठ | २३८४२६७ |
| १० | बडनेरा | २६८१३०० |

पोलीस आयुक्त, अमरावती
करीता

प्रती – सर्व संपादक, सदची प्रेस नोट ही जनहितार्थ असल्याने आपले वर्तमानपत्रात प्रकाशित करावी.

Scanned with CamScanner